MHLC160002882022

दाखल दि. ०१.११.२०२२
नोंदणी दि. ०१.११.२०२२
निकाल दि. १३.०३.२०२४
कालावधी ०१ वर्षे ०४ महिने १२ दिवस

**प्रथम कामगार न्यायालय, अहमदनगर यांचे कोर्टात**
**शरद जी. देशपांडे, न्यायाधीश तथा उपदान नियंत्रण अधिकारी यांचेसमोर**

**नि.ओ– ४**

**अर्ज पीजीए (वसुली) क्र. ५१/२०२२**
(CNR No.MHLC16-000288-2022)

साहेबराव आबाजी सातकर
वय– ५६ वर्षे, धंदा– काही नाही,
रा. मांडवे (तांबेवाडी),पो. फात्याबाद,
ता. श्रीरामपूर, जि. अहमदनगर ... **अर्जदार**

**विरुध्द**

१. महाव्यवस्थापक,
श्रीरामपूर दुध, जिल्हा मध्यवर्ती,
सह.दुध व्यावसायीक संघ मर्या.
बाभळेश्वर, ता.राहाता,
जि.अहमदनगर.

२. श्रीरामपूर दुध, जिल्हा मध्यवर्ती,
सह. दुध व्यावसायीक संघ मर्या.
बाभळेश्वर, ता. राहाता,
जि. अहमदनगर. ... **सामनेवाले**

**वकील:** श्री. श्रीरंग गिते वकील अर्जदारातर्फे.
श्री. अशोक पाटील वकील सामनेवालेतर्फे.

**:न्यायनिर्णय:**

( दिनांक : १३.०३.२०२४ )

१. प्रस्तुत प्रकरण अर्जदार साहेबराव आबाजी सातकर याने देय रक्कम उपदान प्रदान कायदा १९७२ चे कलम ८ नुसार देय रक्कमेबाबत वसुली प्रमाणपत्र मिळण्याच्या अनुषंगाने दाखल केला आहे. अर्जाची थोडक्यात पार्श्वभूमी अशी की—

अर्जदाराने सामनेवाले यांचे नोकरीचा राजीनामा दिल्यानंतर अर्जदारास देय उपदानाची रक्कम दिलेली नाही. त्याबाबत त्याने न्यायालयात अर्ज पीजीए नं. १८३/ २००८ दाखल केला होता व त्यामध्ये न्यायालयाने दि. २८.७.२०२२ रोजी अंतिम आदेश करुन उपदानाची रक्कम रु. ८३,१०६/— व सदर रक्कमेवर दि. १.१.२०१७ पासून द.सा.द.शे.९ टक्के दराने रक्कमेची वसुली होईपर्यंतच्या व्याज देण्याचा आदेश झाला होता. त्याबाबत अर्जदाराने दि. ११.१०.२०२२ रोजी सामनेवाले यांन नोटीस पाठवून न्यायालयाचे निर्णयाची अंमलबजावणी करुन व्याजासह उपदानाची रक्कम देण्याची विनंती केली परंतु अर्जदारास रक्कम दिलेली नाही. तथापि, आजतागायत सामनेवाले यांनी सदरची रक्कम दिली नाही तरी मूळ अर्ज पीजीए नं. १८३/ २०१८ ची अंमलबजावणी होणे अत्यंत गरजेचे आहे. कारण पत्र व प्रत्यक्ष विनंत्या करुन ही सामनेवाले यांनी सदरची रक्कम भरली नाही अथवा आदेशास वरिष्ठ न्यायालयाकडून स्थगिती मिळविली नाही. अशा परिस्थितीत रक्कम वसुल होवून मिळण्याबाबत प्रस्तुतचा अर्ज केला आहे.

२. नोटीशीच्या अनुषंगाने प्रकरणात सामनेवाले नं. १ व २ हजर होवून त्यांनी त्यांचे म्हणणे नि. सी— ४ वर सविस्तरपणे दाखल केलेले असून सामनेवाले यांनी अर्जातील संपूर्ण कथने नाकारुन प्रस्तुतचा अर्ज दाखल करणे योग्य नसल्याचे म्हटले आहे. त्यांच्या मते, बॅकेची आर्थिक परिस्थिती बिकट असल्याने बॅकेकडून कर्ज घेवून त्यासाठी बॅकेकडे दुध संघाची मालमत्ता गहाण ठेवली आहे. संघाने आजपर्यंत बॅकेचे कर्ज फेडले नाही. वास्तविक, सामनेवाले यांचे श्रीरामपूर दूध जिल्हा मर्यादित दुध व्यवसाय संस्था एक सहकारी कायदयाखाली नोंदणी झालेली संस्था आहे. जिल्हयातून दुध संकलन

करणे हे संस्थेचे काम आहे. अशाप्रकारची इतर दुध संस्था संकलनाचे काम करीत असल्याने संस्थेचे दुध संकलनाचे काम अतिशय कमी झाले होते. दुध संस्थेत सदरचा दररोजचा व्यवसाय करणे अडचणीचे होवून बसले होते. कामगारांचे पगार व इतर कार्यालयीन खर्च करणे त्यांना अवघड झाले. गेल्या १० वर्षापासून दुध संकलन कमी झाले असल्याने संघ अतिशय तोटयात आहे. त्यामुळे अर्जदाराने दाखल केलेला वसुली प्रमाणपत्र मिळण्याचा अर्ज नामंजूर करावा असे म्हटले आहे.

३. प्रकरणातील एकंदर पार्श्वभूमी पाहता नि. ओ– २ वर मुद्दे काढले असून सदर मुद्यांची कारणमिमांसा निष्कर्षासह मी खालीलप्रमाणे देत आहे–

| <u>मुद्दे</u> | <u>निष्कर्ष</u> |
|---|---|
| १. अर्जदार हे रक्कम रु.८३,१०६/– सामनेवाले यांचेकडून वसुल होण्यास पात्र आहे असे सिध्द करतो का ? | ... होकारार्थी |
| २. अर्जदार रक्कम रु. ८३,१०६/– वसुली दाखला मिळण्यास पात्र आहे का? | ... होकारार्थी |
| ३. काय आदेश? | ... अंतिम आदेशाप्रमाणे. |

**<u>:कारणमिमांसा:</u>**

४. अर्जदाराने त्याच्या मागणीच्या पृष्टयर्थ स्वत:ला नि. यु– ५ वर तपासले. तसेच, त्याने नि. यु– २ सोबत दि.११.१०.२०२२ रोजीच्या मागणीपत्राची प्रत, ए.डी.च्या पावत्या व ट्रकींग रिपोर्ट इ. जोडले आहे. अर्जदाराचा उलटतपास सामनेवाले यांचे वकिलांनी घेतला असून त्याने पुरावा बंद केल्याची पुरशिस नि. यु– ९ वर दिली आहे. उलटपक्षी, सामनेवाले यांनी तोंडी पुरावा न देण्याबाबतची पुरशिस नि. सी– ५ वर दाखल केली आहे. अर्जदाराचे वकील श्री. गिते व सामनेवाले यांचे वकील श्री.पाटील यांचा युक्तिवाद ऐकला. त्यांनी असे प्रतिपादन केले की, श्रीराम दुध संघ सध्या तोटयात आहे. त्यांचे बायोप्रॉडक्ट सध्या बंद आहेत. सदरचा संघ ज्ञानेश्वर उंडगे यांना चालविण्यास दिला आहे व दुध संघ तोटयात असल्याने देणी देवू शकत नाही परंतु ही कारणे पुरेशी नाहीत.

५. अर्जदाराने आपल्या मागणीच्या अनुषंगाने नि. यु– ६ वर सविस्तर असे शपथपत्र दाखल केले आहे व सामनेवाले यांना दिलेल्या पत्राची प्रत, रजिस्टर ए.डी. पावती, इ. कागदपत्रे दिली आहेत. त्याने अर्जातील संपूर्ण कथने पुनश्च: एकवेळ उद्युकृत केली आहेत व सदरची रक्कम मिळण्याबाबत म्हटले आहे. सामनेवाले यांचे वकील श्री. पाटील उलटतपासामध्ये न्यायालयासमोर कोणतीही गोष्ट आणू शकले नाहीत. एकंदरीत मी संपूर्ण प्रकरणाचे काळजीपूर्वक अवलोकन केले असता सदरच्या अर्जास वरिष्ठ न्यायालयाकडून कुठलाही स्थगन आदेश नाही अथवा तो आदेश कुठल्याही न्यायालयात बाजूला सारला नाही त्यामुळे आजही सदरचा आदेश अस्तित्वात असून कामगार न्यायालयाचे अर्ज पीजीए नं. १८३/ २०१८ मधील निकालाप्रमाणे सदरची रक्कम वसुल होवून मिळण्यास अर्जदार निश्चितच पात्र आहे. अर्जदाराने बहुतांश प्रकरण सिध्द केले असल्याने मी मुद्दा क्र. १ व २ चे उत्तर होकारार्थी देवून खालीलप्रमाणे आदेश करीत आहे–

**<u>:आदेश:</u>**

१. अर्जदाराचा अर्ज मंजूर केला जातो.

२. अर्जदार हा सामनेवाले नं. १ व २ यांचेकडून रक्कम रु.८३,१०६/– (अक्षरी रुपये त्रेएंशी हजार एकशे सहा) वैयक्तिक व संयुक्तिकरित्या मिळण्यास पात्र असल्याचे जाहीर केले जाते. सदर रक्कमेवर द.सा.द.शे. ९ टक्के व्याज दर दि.१.१२.२०१७ पासून द्यावा.

३. नियमाप्रमाणे वसुली प्रमाणपत्र देण्यात यावे.

सही/–

(शरद जी. देशपांडे)

दिनांक : १३.३.२०२४

नियंत्रण अधिकारी, उपदान प्रदान कायदा तथा
न्यायाधीश, प्रथम कामगार न्यायालय, अहमदनगर

युक्तिवाद ऐकल्याचा दि.१३.३.२०२४
न्यायनिर्णय जाहीर केल्याचा दि.१३.३.२०२४
न्यायनिर्णय टंकलिखीत केल्याचा दि.१३.३.२०२४
न्यायनिर्णय तपासून सही केल्याचा दि.१३.३.२०२४